झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा /सप्रा-१/ मा.क्र.१५/घोरपडे पेठ/७९८९/२०२४
दिनांक : २८ / ११ /२०२४.

## झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश.

**<u>प्रस्तावना -</u>**

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे उक्त अधिनियम असा करणेत आला आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/ प्र.क्र.२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे;

झोपडपट्टी पुनर्वसन या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

(२) ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद भवानी पेठ येथील फा. प्लॉट १६९,१७०,१७१, लोहियानगर, घोरपडे पेठ, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रामधील क्षेत्रफळ १४२४३.७२ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर मिळकत असा करणेत येत आहे) सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. टारगेट इन्फ्रा डेव्हलपर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव दि. ०५/०७/२००८ रोजी दाखल करणेत आलेला आहे आणि, अतिरिक्त मुख्य कार्याकारी अधिकारी, झो.पु.प्रा.,पुणे यांनी सदर प्रकरणात ७० % हून जास्त झोपडीधारकांचे संमतीपत्र प्राप्त असल्याचे प्रमाणीत केले आहे; आणि,

(३) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व त्रिमिती पद्धतीने परीगणेनुसार तसेच प्रत्यक्ष जागेवरील मोजणीनुसार एकूण क्षेत्र १४२४३.७२ चौ.मी. उक्त क्षेत्र तत्कालीन सक्षम प्राधिकारी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांनी सदरचे क्षेत्र महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२१/०७/१९८४ रोजी पृष्ठ क्र. १९४९ वर प्रसिद्ध अधिसूचनेद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ४ मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित केले आहे;आणि,

(४) ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.०४/०३/२०२४ रोजीची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक - पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, मार्च १४ ते २०, २०२४/फाल्गुन २४-३०, शके १९४५, पान क्र. ०८ ते ०९ मध्ये तसेच दै.जनमंथन व दै. विश्वदर्पण या वृत्तपत्रात दि. ११/०३/२०२४ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा ठिकाणी प्रत्यक्ष जागेवर दि. ०५/०३/२०२३ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि,

(५) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारित अधिनियम २०१७ चे कलम ३(क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी,झो.पु.प्रा.,पुणे हे सक्षम आहेत; आणि,

(६) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद एकूण १४२४३.७२ चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे; आणि,

(७) ज्याअर्थी, सदर प्रकरणी दि. ०४/०३/२०२४ रोजी अधिनियमाच्या कलम ३ (क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारणा करणा-या आदेशा संदर्भात प्रसिद्ध केलेल्या पुर्वसूचने संदर्भात हरकती प्राप्त न झाल्याने प्रकरणातील वस्तुस्थिती विचारात घेता प्रस्तावित क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यासंदर्भात आदेश पारित करणे आवश्यक आहे;

त्याअर्थी, मी नीलेश र. गटणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील नमूद तरतूदीनुसार खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे .

**आदेश** :-

(१) सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्या संदर्भातील दि.२२/०८/२०२३ रोजीचा पूर्वसुचना आदेश कायम करून खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे अधिनियमांतर्गत कलम ३ (क) नुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे व्यथित होणाऱ्या व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३(क) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई यांचे कार्यालयात अपील दाखल करता येईल.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव** : फा. प्लॉट १६९,१७०,१७१, लोहियानगर, घोरपडे पेठ, पुणे,

**महानगरपालिका क्षेत्र** : पुणे महानगरपालिका.

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनी भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमीती पद्धतीने प्रत्यक्ष जागेवरील मोजणी नुसार) | चतु:सिमा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| भवानी पेठ, पुणे | फा.प्लॉट १६९,१७०,१७१ | खाजगी | १४२४३.७२ चौ.मी. | **पुर्वेस** - लागू ओढा<br>**पश्चिमेस** - लागू रस्ता<br>**दक्षिणेस** - लागू रस्ता व लागू फा. प्लॉट १६८, फा. प्लॉट १६७ व फा. प्लॉट १६६<br>**उत्तरेस** - लागू रस्ता |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

**स्थळ** :- पुणे.

**दिनांक** :-२८/११/२०२४.

नीलेश र. गटणे, (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

**प्रत :- रजि. पोस्ट द्वारे - लोहियानगर, घोरपडे पेठ, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन आदेश घोषीत करण्याच्या संदर्भातील कलम ३ क अंतर्गत अंतिम आदेश**

१. मा. आयुक्त, पुणे/ पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांना सदर जमीन आपले लक्ष महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) सुधारित अधिनियम २०१७ चे कलम ३ क कडे वेधण्यात येत आहे. उक्त आदेश अंतिम करण्यात आल्यानंतर या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी आपल्या विभागाच्या वेगळ्या संमती अथवा ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही. खाजगी क्षेत्राचे बाबतीत विकसकाकडे मालकी / विकसन हक्क नसल्यास असे क्षेत्र उक्त अधिनियमामधील प्रकरण पाच मधील तरतूदींन्वये संपादित करणे आवश्यक असल्यास अशा खाजगी क्षेत्राचा मोबदला उक्त अधिनियमाच्या कलम १७ मधील तरतूदीनुसार निर्धारित करण्यात येईल.

२. मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना माहितीसाठी सादर.

३. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र १, झोपुप्रा पुणे यांना सूचित करण्यात येते की या अधिसूचनेच्या प्रती योजनाक्षेत्र / झोपडपट्टी क्षेत्रात डकवून प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रसिद्धी अहवाल प्रकरणात समाविष्ट करण्यात यावा

४. व्यवस्थापक, मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६

५. लेखा विभाग, झोपुप्रा, पुणे यांना सूचित करण्यात येते की या अधिसूचनेच्या प्रती दैनिक वृत्त पत्रात प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रसिद्धी केलेली दैनिक वृत्त पत्राची प्रत प्रकरणात समाविष्ट करण्यात यावी.

६. विकसक मे. टारगेट इन्फ्रा डेव्हलपर्स, रा. १०१/१६, उदय हौसिंग सोसायटी, एरंडवणा, पुणे - ४११००४.